प्रकरण पाचवे

# कादंबरीकार वरेरकरांचे स्थान

प्रकरण पाचवे

# कादंबरीकार वरेरकरांचे स्थान

भार्गवराम विठ्ठल ऊर्फ मामा वरेरकर यांच्या वाङ्‌मयाचे व व्यक्तिमत्वाचे विश्लेषण करताना प्राधान्याने लक्षात येते ते वरेरकर यांच्या विचारातील पुरोगामित्व. लघुकथा, कादंबरी आणि नाटक या ललित साहित्याच्या तिन्ही क्षेत्रात मामा वरेरकर यांनी केलेले लिखाण विपुल आहे. ह. ना. आपटे यांच्या काळात वरेरकर यांनी कादंबरी लिहायला सुरूवात केली असली तरी वरेरकर यांचा कादंबरीकार म्हणून खरा ठसा उमटतो तो 'गतभर्तृका' या टोपण नावाने लिहलेल्या 'विधवाकुमारी' या कादंबरीमुळे या कादंबरीत वरेरकर यांच्या लिखाणातील सर्व वैशिष्टयाचा समावेश आहे. आपल्या कादंबऱ्यातील घटनांचा स्थळ व काळ याचा तपशील देऊन त्याचे वास्तववादी स्वरूप स्पष्ट करण्याची वरेरकर यांची प्रवृत्ती दिसते. त्यांत वावरणाऱ्या माणसांचे सामुहिक स्वभाव वैशिष्टयांचे रंग घेऊन अवतरताना दिसतात. उदा. उ. कोकण, द. कोकण (मालवण) पुणे, मुंबई यातील जनमानसाची वैशिष्टये वरेरकर यांच्या कादंबऱ्यात दिसून येतात. सामाजिक कादंबरी ही आधुनिक इतिहासाची एक बखर असते. वरेरकर यांच्या कादंबऱ्यातील व्यक्ती काल्पनिक असल्या तरी त्यांचे एकूण स्वरूप प्रत्यक्ष व्यावहारिक वास्तवावर आधारलेले दिसते.

वरेरकर यांच्या कादंबऱ्या वाचनीयतेच्या सदरांत दाखल होऊन हरिभाऊचे मध्यमवर्गीय सामाजिक युग सुरू असण्याची ग्वाही देतात. पहिल्या कालखंडात शरच्चंद्र चट्टोपाध्याय, बंकिमचंद्र बन्दोपाध्याय, रविन्द्रनाथ टागोर, आणि प्रभातकुमार मुखोपाध्याय हया लेखकांच्या अनेक कादंबऱ्यांचे आणि टागोर यांच्या इतर साहित्याचे वरेरकर यांनी मराठीत अनुवादन केले. वरेरकर याचे भाषांतरकार म्हणून ऋण हे वरेरकर यांचे शत्रू ही मान्य करतात. परंतु वरेरकर

यांच्या कादंबऱ्याकडे दुर्लक्ष होण्यास कोणती गोष्ट कारणीभूत झाली असावी असा प्रश्न पडतो. कोणतीही गोष्ट निव्वळ आहे म्हणून स्वीकारायची नाही. तर त्यासंबंधी चिकित्सक वृत्तीने विचार करायची सवय वरेरकर यांना जडली. वरेरकर यांच्या सर्व लेखनावर ह्या प्रवृत्तीचा प्रभाव पडलेला दिसतो. ''परंपरेवर आघात करून परंपरेला नवे वळण देऊन नव्या निष्ठा व नवी मूल्ये प्रस्थापित करण्याची धारणा ही पुरोगामित्वाची महत्त्वाची खूण ही वरेरकर यांच्या साहित्यातून दिसून येते. ''[१]

साहित्याने केवळ विचारांचे नाविन्य किंवा विचार स्वातंत्र्य यांवर समाधान न मानता त्यांची आचारात झालेली परिणती नेहमीच महत्त्वाची मानली जाते. आणि म्हणूनच क्रांतिकारक विचारांच्या केवळ प्रवर्तनापेक्षा समाज बदलू पाहणारी कृती ही जितकी धैर्याची आणि माणसांची कसोटी पाहणारी तितकी समाजाला गतिमान करू पाहणाऱ्या पुरागामित्वाची निदर्शक असते. ही वरेरकर यांच्या विचारांची मुख्य दिशा होती त्या दृष्टीने महाराष्ट्रातील पुरागामित्वाचे सर्वश्रेष्ठ प्रतीक 'स्त्री' आहे. असे मामांना वाटे आणि म्हणूनच 'जागी झालेली आणि जागी होऊ पाहणारी स्त्री', ही काही नव्या प्रबोधनाचा वारसा नसून 'स्त्री' हीच मूर्तिमंत जागृती आहे. असे वरेरकर यांना वाटत होते. मानवी मूल्यांना रूढी, लोकभ्रम धर्माच्या विकृत कल्पना आणि परंपरा यांच्यामुळे ज्यावेळी अवकळा येते. त्यावेळी नव्या विचारांचे प्रवर्तन आणि बंडखोरीने त्यातील क्रांतिप्रवणता अंगीकृत करून समाजाला गती देऊन शाश्वततेला नव्या संदर्भात उजाळा देण्याचे कार्य हे साहित्यिकांचे असे वरेरकर यांना वाटत होते.

स्त्रीचे संयत आणि उत्कट रूप 'विधवाकुमारी' या कादंबरीमध्ये चित्रित झाले आहे. वरेरकर यांच्या काही कादंबऱ्या अतिरंजित आणि अतिरेकी झाल्यामुळे त्यांच्या कृतीतून शेवटी

अत्याधुनिक पुरोगामी आचार आणि विचाराची श्रेष्ठ निदर्शक व्यक्ती पुरूषच ठरतो. 'विधवाकुमारी' तील ताईचे यजमान 'गोदू गोखले' मधील राजारामशास्त्री, 'धावता धोटा' मधील बाबा शिगवण इत्यादी व्यक्तिचित्रणावरून दिसून येते.

१९१६ ते १९५६ या चाळीस वर्षाच्या काळात जी जी वादळे उठली होती ती नाटक, कादंबऱ्याच्या रूपाने वरेरकर यांनी वाङ्मय रूप करून टाकली. मामा वरेरकर यांच्या पुरोगामित्वाची ही भूमिका त्यांच्या कादंबरी वाङ्मयातून सातत्याने प्रकटली आहे. राजकीय दृष्टिकोनाची चर्चा, चिकित्सा परकीय सरकारच्या जाचक बंधनामुळे नाटकांतून करता येत नाही. त्यासाठी कादंबरी लेखन सोयीचे ठरेल या जाणिवेने ते कादंबरी लेखनाकडे वळले. सामाजिक जाणिवांचा मानवता प्रेरित अविष्कार हा राजकारणाचा विशेष नसून राजकारण हे सत्ता संघर्षाचं केवळ प्रतीक असल्याने त्यातून पुरोगामित्वाच्या भूमिकेचे अविष्करण होत नाही हे लक्षात घेऊन वरेरकर यांनी कादंबऱ्या मधून सामाजिक प्रश्नांचीच मांडणी केली. जागृत स्त्रीचे तिच्यातील सुप्त सामर्थ्याचे आणि बंडखोरीचे तत्त्वज्ञान वरेरकर यांनी आवेशाने पुढे आणले आहे. वास्तवाच्या बैठकीवर कादंबऱ्याची रचना करून आधुनिक स्त्रीत्वाचा अविष्कार करताना मामा वरेरकर यांनी स्त्रीला पराकोटीची बंडखोर आणि अत्याधुनिक ठरवून अवास्तवतेचा दोष ओढवून घेतलेला दिसून येतो. उदा. :— 'विधवाकुमारी' कादंबरीतील नायिका 'मथू' हिने वैधव्य आल्यानंतर घरच्या सनातनी वातावरणाला, पुरूषांच्या वर्चस्वाला शिक्षणाने स्वत:चे दास्य पार उडवून लावले. आपल्याला शिक्षण व स्वातंत्र्य मिळाले नाही या भावनेने मामा वरेरकर यांच्या कादंबऱ्यातील नायिकांच्या आया नायिकांच्या मागे उभ्या राहतात असे दाखवून मामा वरेरकर यांनी स्त्री हीच पुरोगामित्वाची खरी शक्ती आहे हे दाखवले आहे.

'विधवाकुमारी' तील मथू ही उच्च शिक्षणाने एक नवा आदर्श गाठते. तर 'गोदू गोखले' मधील गोदू आपल्या सर्वकष बंडखोरीने जुन्या समाजरचनेला विलक्षण धक्का देते. मुलीच्या जातीने असेच का वागावे ? असे का वागू नये ? या तिच्या प्रश्नातील भेदकता समाजातील प्रश्नांच्या सूक्ष्म अवलोकनातून मामा वरेरकर यांनी अविष्कृत केली आहे.

अगदी सुरवातीला म्हणजे १९१२ च्या सुमारास 'संसार की संन्यास' हया नावाची एक बुध्दकालीन ऐतिहासिक लघुकादंबरी 'भावशर्मा' हया टोपण नावाने लिहली. परंतू मामा वरेरकर हे १९२६ साली लिहिलेल्या 'चिमणी' हया कादंबरीचाच पहिली कादंबरी म्हणून उल्लेख करतात. ही कादंबरी लिहिण्यामागची प्रेरणा अशी की, यशस्वी नाटककार हा लीलया कादंबरी लिहू शकतो. हे मामा वरेरकर यांना सिध्द करून दाखवायचे होते.

मामा वरेरकर हे जीवननिष्ठ साहित्यिक होते. समाज जीवनाशी निष्ठा राखून साहित्य निर्मिती करणारा त्यांचासारखा नाटककार व कादंबरीकार क्वचितच आढळतो. मामा वरेरकर यांच्या कादंबऱ्यात मध्यमवर्गीय 'मथू' व 'गोदू' जशा आढळतात. तसेच ठकू तेली, सुके बोंबील खाणारा गणू पट्टेवाला 'धावत्या धोटयांतील' बाबा शिगवण, बिजली असे खालच्या वर्गातील व्यक्ती ही आहेत.

ती पात्रे मामा वरेरकर यांनी आत्मीयतेने व समानतेने वर्णिलेली आहेत. वरेरकर हे स्त्री जातीचा कैवार विशेष हिरारीने घेतात. एखादी 'पुरोगामी' स्त्री ही वापरणार नाही. अशा शब्दात ते पुरूषांना धिक्कारतात. मामा वरेरकर यांच्या कादंबऱ्यातील स्त्रियांसमोर पुरूष नेहमीच नेबळे बावळट व कर्तृत्वशून्य वाटतात. मामा वरेरकर यांच्या स्वत:च्या जीवन निष्ठेतून त्याची कलाकृती अवतीर्ण होत असते. आपल्या कथानकातील पत्रांच्याद्वारे ते स्वत:चीच प्रतिमा निर्माण करीत असतात. मामा वरेरकर हे आगरकर संप्रदायातील लेखक असल्याने त्यांच्या नायिकांचे स्फूर्तिस्थान हे आगरकर आहेत असे वाटते. वरेरकर यांनी १९३२ मध्ये बडोदे येथील साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावरून आगरकर संप्रदायाची मीमांसा केलेली होती.

उपेक्षेच्या काळात ही मामा वरेरकर यांनी कादंबरी लेखनाचे कार्य निष्ठेने व चिकाटीने चालविले. त्यांच्या या साहित्य प्रेमाबद्दल व असामान्य परिश्रमशीलतेबद्दल मराठी वाचकांना त्यांच्याविषयी सादर कौतुकच वाटत राहील. मामा वरेरकर यांनी ललित वाङ्मय लिहिले. लोकजागृतीकरीता कलेच्या निरनिराळया माध्यमांचा त्यांनी उपयोग केलेला आहे. वीस वर्षे मामा वरेरकर यांनी कादंबरी लेखनांची पूर्व तयारी केली व हाही वाङ्मय प्रकार यशस्वी रीतीने हाताळला आदि, मध्य, अंत या विषयीच्या वरेरकर यांच्या कल्पना स्पष्ट नसल्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यात पाल्हाळ आलेला दिसून येतो.

मामा वरेरकर यांच्या बऱ्याच कादंबरीच्या उत्तरार्धावरून सुध्दा कथानक पूर्णपणे सांगून झाले आहे असे वाटत नाही. पण त्यामुळेच कादंबरीचे सौंदर्य निखालस वाढले आहे. कारण त्यातूनच वाचकांच्या मनात विचारांची वादळे निर्माण होतात. मामा वरेरकर यांच्या कादंबऱ्यांतील अपूर्णता काही ठिकाणी विकासकारक व उपकारक झालेली आहे. लोकजागृतीच्या हेतूला ती पोषक ठरली आहे.

मामा वरेरकर यांचा वाद हा व्यक्तिविषयक नाही तो समाजविषयक आहे. समाजभिमुखतेमुळेच तो खराखुरा प्रतिनिधीभूत झालेला आहे. त्यांचे समाजदर्शन फारसे मूलगामी नाही. पण ते अवास्तव आहे असे मात्र म्हणता येणार नाही. महाराष्ट्रात उद्‌भवलेल्या काही वैचारिक चळवळींचे प्रतिबिंब मामा वरेरकर यांच्या कादंबरी वाङ्मयात उमटले आहे. सामाजिक जीवनात नित्य चर्चेला निघणारे वाद या विषयांचाही मामा वरेरकर यांनी आपल्या कादंबऱ्यांतून परामर्ष घेतला आहे. हरिभाऊंप्रमाणे वरेरकर यांनी वाचकांना वास्तवोन्मुख व जीवनोन्मुख केले नसून त्याला काही सामाजिक सत्यांची प्रचीती ही आणून दिलेली आहे.

मामा वरेरकर याची आवडती व नावडती मते त्यांच्या कादंबऱ्यातून व्यक्तिगत आवडीनिवडीचे प्रतिबिंब उमटले आहे. आपल्या आवडत्या मतांचा प्रसार करण्याकरिता व नावडत्या मतांचे खंडन करण्याकरिता मामा वरेरकर यांना कादंबरी हे माध्यम फार उपयुक्त वाटते. वरेरकर यांनी कादंबरी या प्रकारांतून आपली आवडती विचारसरणी आवर्जून पुढे मांडली आहे. व स्त्रियांच्या हक्काचा जोरदार पुरस्कार केला आहे. वरेरकर यांच्या आग्रही व्यक्तिमत्वामुळेच त्यांच्या कादंबरी वाङ्मयाच्या प्रसाराला पायबंद बसला असावा. आपल्या कादंबऱ्यांच्या कथानकांतून त्यांनी प्रचाराचा भडिमार केलेला आहे. पुरूष शाहीला शह देण्याकरिता त्यांनी तेजस्वी व आक्रमक 'स्त्री' रंगविली आहे. पांढरपेशाच्या दांभिकतेवर कडक टीका केलेली आहे. तथाकथित सुशिक्षितांच्या मनोवृत्तीचा उपहास केलेला आहे. वरेरकर यांच्या कादंबरी वाङ्मयात त्यांच्या व्यक्तिगत विचारसरणीचे स्पष्ट पडसाद उमटले आहेत.

मामा वरेरकर यांच्या कथावाङ्मयात त्याची प्रचारकी भूमिका स्पष्टपणे दिसते. सुष्ट—दृष्ट मते वाङ्मयांतून मांडत असताना त्यांनी सत्यान्वेषणाचे कार्य चोखंदळपणे पार पाडले आहे. डॉ. केतकरांप्रमाणे त्यांचे सत्यान्वेषण व समाजसंशोधन मूलगामी व शास्त्रीय स्वरूपाचे नसेल किंवा वा. म. जोशी यांच्या प्रमाणे त्यांच्या कादंबऱ्यातील तत्त्व—चिकित्सेला सात्विकतेची व सौजन्याची जोड मिळाली नसेल पण मामा वरेरकर यांच्या कादंबऱ्यातून सत्यान्वेषणाची हार्दिकता प्रगट झालेली आहे. मराठी कादंबरीच्या कलाविकासाला वैचारिकतेची बैठक त्यांनी मिळवून दिलेली आहे व वाङ्मयाकडे कोणत्या दृष्टिकोनातून बघावे याचे उत्कृष्ट निदर्शन केलेले आहे. ज्या जाज्वल्य मनोवृत्तीचा कै. राजवाडे यांनी आपल्या लेखांतून उल्लेख केलेला आहे. ते मामा वरेरकर यांच्या लेखनांत ओतप्रोत आहे. या जाज्वल्य मनोवृत्तीमुळेच विधवांची दु:खे पाहून त्यांचा जीव तिळतिळ तुटला आहे. आणि गरीबांची उपासमार पाहून घश्याखाली घास उतरत नाही. तर स्त्रियांची बेअब्रू झालेली पाहून द्रौपदीच्या भीमाप्रमाणे त्यांना द्वेष येतो. म्हणूनच मामा वरेरकर यांच्या कादंबरी वाङ्मयात अन्याय निवारण्याचे व अज्ञान ध्वंसनाचे कार्य त्यांनी किती एकाग्रपणे केले हे दिसून येते. समाजातील निरनिराळया जातीचे व थरांचे त्यांनी वास्तवपूर्ण चित्रण केलेले आहे. आपल्या समाजात परंपरेने चालत आलेल्या अनिष्ठ रूढींचा व चालिरीतीचा मामा वरेरकरांनी आपल्या कादंबऱ्यांतून तीव्र निषेध व्यक्त केले आहे. धर्मिक समजुतीतील अज्ञानाचा व भोळसर पणाचाही त्यांनी धिक्कार केलेला आहे. मामा वरेरकर हे समाजातील सुख—दु:खे समजावून घेतात हे दिसून येते. मामा वरेरकर यांची लेखनाची भूमिका सर्वांनीच समजावून घेऊन ती उपयोगात आणण्यासारखी आहे. जे काही लिहिले आहे, त्यांचा असंख्य वाचकांनी उपभोग घेतला की लेखकांच्या लेखनाचे सार्थक झाले असे समजावे असे मामा वरेरकर यांचे मत होते.

मराठी ललित वाङ्मयाची वरेरकर यांनी बहुविध क्षेत्रे काबीज केलेली आहेत. त्यांच्या वाङ्मयावर टीकाही झालेली आहे. त्याचे लेखनही विपुल आहे व तपश्चर्याही दीर्घ आहे. आधुनिक मराठी लेखकांत वरेरकरांसारखे सव्यसाची व बहुप्रसव लेखक असामान्यच आढळेल. लोकमत तयार करण्याकरिता लोकांचे मन ओळखूनच त्यांनी वाङ्मय निर्मिती केलेली आहे. व आगामी समाज निर्मितीकरिता वाङ्मयाचा खड्गाप्रमाणे उपयोग करून नवजागृतीच्या दिशेने वाटचाल केलेली आहे. परभाषांतील कादंबरी वाङ्मयाचा भाषांतर रूपांतराच्या मार्गाने परिचय करून देण्यात भा. वि. वरेरकर यांची कामगिरी महत्त्वाची मानली जाते. मराठी कादंबरीला नवा साजशृंगार चढवला आणि तिला अभिनव आभूषणांनी अलंकृत करण्यात वरेरकर यांचा वाटा आहे. मध्यमवर्गीय स्त्रीने आर्थिकदृष्टया स्वतंत्र व स्वावलंबी होण्याची कल्पना उत्साहाने उचलून धरण्यात वरेरकर यांनी विशेष पुढाकार घेतलेला दिसून येतो. मध्यमवर्गीय जीवनाच्या परिचित प्रदेशाबाहेरील जीवनाची थोडीफार तोंडओळख करून देण्यामध्ये भा. वि. वरेरकर यांचा विशेष उल्लेख केला जातो.

स्त्री—पुरूषातील परस्पर संबंध याचे अपेक्षित व्यक्तिगत स्वातंत्र्य याचा वरेरकर यांनी आपल्या कादंबऱ्यांमध्ये परामर्ष घेतला आहे. वरेरकर याच्या मानसकन्यांनी तर पुरूषद्वेषाचा अतिरेक करून आपल्या सर्वांगीक स्वातंत्र्यांच्या हक्कांची अगदी अंमलबजावणी करून घेतली.

१९३२ ते १९४८ या सोळा वर्षाच्या काळात वरेरकर यांनी स्वत:च्या २५—२६ कादंबऱ्या व शरदच्चंद्र चट्टोपाध्यायांच्या ८—१० कथांचा अनुवाद एवढे विपुल लेखन केले. वरेरकर यांनी या कथात वेगवेगळे प्रश्न हाताळले. 'कुलदैवत' मधील माणक वेश्यांच्या जीवनविषयी सहानुभूतीने प्रेरित होऊन ते समजून घेण्यासाठी त्यांची मैत्री जोडते. 'उमलती कळी' ची गुप्त साहित्यिक

नायिका सनातनी काकांच्या तावडीतून स्वत:ची व आपल्या प्रियकराची शर्थीने सुटका करून घेते. 'तरते पोलाद' मध्ये आय. सी. एस. लोकांची सुवर्णनिष्ठ लग्ने, साम्यवादाचे आकर्षण, ज्याच्या जन्माविषयी रहस्य आहे. अशा कृतकपुत्राची मनोवृत्ती असे किती तरी प्रश्न एकत्रित आले आहेत. कठीण परिस्थितीला तोंड देण्याकरिता असाह्य स्त्रियांनी हॉटेलचा धंदा काढावा अशी मामा वरेरकर यांची शिकवण होती. 'वेणू वेलणकर' 'गीता', 'कुलदैवत' या कादंबऱ्यांतील नायिका ही आपला धंदा (व्यवसाय) फार यशस्वीरीत्या करून दाखवताना दिसतात. दारूबंदीच्या प्रचारासाठी मामा वरेरकर यांनी 'पेटते पाणी' ही कादंबरी लिहिली. ग्रामसुधारणेच्या कल्पनेसाठी व ग्रामजीवन विषयक अशा 'सात लाखांतील एक', 'फाटकी वाकळ' व तिचा उत्तरार्ध 'मी—रामजोशी', तर राजकीय घटनांवर लिहलेली, 'शिपायाची बायको' व '१९१४ नंतर' या कादंबऱ्या मामा वरेरकरांनी लिहिल्या. 'तोंड मिळवणी' या कादंबरीमध्ये केवळ अनुभवांच्या शाळेत शिकलेली वयस्क लेखिका तिची असाधारण बुध्दिमान कन्या व तिच्या आईची विवाह बाह्य सवत याची कथा चितारली आहे. लोकांचे लक्ष ज्यांनी वेधून घेतले अशा अनेक चलनी प्रश्नांवर त्यांनी आपल्या कादंबऱ्यांचे हत्यार चालविले. मथूसाठी—चंदू, गोदूसाठी—नाना, नर्गिससाठी—गोविंदा, देवीसाठी—श्रीनिवास ही पुरूष पात्रे अकेलेला पारखी झाली आहेत. वयस्क पात्रांमध्ये ही असाच पक्षपात दिसून येतो. बहुतेक नायिकांचे बाप आपमतलबी, व्यवहारी व क्षुद्रवृत्तीचे आहेत. तर नायिकाच्या आया समजदार, नव्याचे स्वागत करणाऱ्या आंहेत. व प्रत्येकीला संसारातील दास्य व हृदयशून्यता यांची जाणीव झालेली असते.

त्याचप्रमाणे मामा वरेरकर यांच्या कल्पनांत एका तऱ्हेचे संवग स्वप्नरंजन आढळून येते. आपल्या नायिकांना किंवा आवडत्या पात्रांना कर्तबगारीची देणगी देताना ते कशाला काय म्हणावे याचे

फारसे तारतम्य राखीत नाहीत. त्यांच्या नायिका बी. ए., एम. ए. च्या परिक्षेत धडाधडा पहिल्या येतात. डी. लिट साठी थिसिस लिहितात. मामा वरेरकारांच्या कादंबरीतील नायिका असमान्य यश मिळवताना दिसतात. मामा वरेरकरांच्या कादंबऱ्यातील खाणावळ चालवणाऱ्या बायका इतक्या भरभरटीस येतात की ज्यांच्या घरी त्या पूर्वी आश्रयाला होत्या त्यांच्या मुलाला नोकरीला ठेवू शकतात. या घटना असंभाव्य किंवा दु:संभाव्य आहेत असे नाही. त्या संभाव्य वाटतील अशी पार्श्वभूमी किंवा व्यक्तिरेखा प्रथम तयार करण्याची तसदी घेण्याची मामा वरेरकर यांना आवश्यकता वाटत नाही. अवास्तवाचा स्विकार करण्यासाठी जी मनोवृत्ती वाचकांच्या ठायी प्रथम निर्माण होणे आवश्यक असते. ती वृत्ती मामा वरेरकर यांच्या या उतरकालीन कादंबऱ्यांतील रंगहीन लेखनपध्दतीत निर्माण होत नाही.

मामा वरेरकर यांच्या कथांत एखादया प्रश्नाच्या दिग्दर्शनाला व विवेचनाला सुरूवात मोठया हिरारीने झाली. त्यांच्या चित्रणात जिवंतपणा आला. त्यांच्या व्यक्तिरेखा हृदयग्राही झाल्या. तरीही ते प्रश्न तडीस नेऊ शकत नाहीत व त्या व्यक्तीचे खरोखर काय करावे हे त्यांना समजेनासे होते. वस्तुस्थितीत त्याचे काय होईल याची प्रतीती लाभत नाही. 'कुलदैवत', 'सात लाखातील एक', 'पेटते पाणी', या सारख्या काही कादंबऱ्यात व्यावसायिक निवडीमुळे

उथळपणा आला आहे. पुढारलेले प्रश्न आणि त्या त्या राजकीय घटना व विचारप्रवाह यांचा उपयोग करून घेण्याची चपळाई त्यांनी यासारख्या कथांत दाखवली व त्यामुळे ते कथावाङ्मयाच्या आघाडीवर टिकून असल्यासारखे वाटतात. या क्षणभुंगरतेची कारणे ही स्पष्ट आहेत. या त्यांच्या लिखाणांतील मन:पूर्वकता व योजकता दोन्हीही एखादया सूक्ष्मदर्शकाने शोधाव्या लागतील. या व्यावसायिक वृत्तीमुळे त्यांची अपंगता लपून जाण्याऐवजी तिची जाणीव दुणावते. त्यातल्या त्यात जे प्रश्न केवळ आर्थिक संबंधावर आधिष्ठित आहेत. त्यांचे निरूपण जास्त समाधानकारक होते.

'विधवा—कुमारी', 'गोदू गोखले' यातील [illegible] [illegible], स्त्री—पुरूषांच्या सामाजिक संबंधासारखा प्रश्न घेतला म्हणजे तेथे आणखी वेगळया प्रकारची गुंतागुंत उद्‌भवते. व यातून आर्थिक संबंधाच्या पायावर भावनांची इमारत उभी केली जाते. मामा वरेरकर यांची याविषयीची जाणीव अपुरी व एकेरी पडते. त्यांचे आणखी एक कारण संभवते. राजकीय कादंबऱ्या ही हव्या तितक्या ऐसपैसपणे प्रसिध्द होणे कठीण जाते हे 'धांवता धोटा' या कादंबरी वरून सांगता येईल. त्यामुळे मामा वरेरकर यांनी सामाजिक कादंबऱ्यांवरच आपली हौस भागवून घ्यावी लागली असावी असे वाटते. स्वातंत्र्याचे पुरस्कर्ते अशी त्यांची आज ख्याती आहे.

राजकारणविषयक नाटके लिहिणे जवळ जवळ अशक्य झाल्यामुळे तसले विषय कादंबरीसाठी घ्यावे अशी इच्छा असतानाही मला पुन: समाजातील क्रांतिकारक विषयावर लेखन करण्यासाठी 'गोदू गोखले' ही कादंबरी लिहिणे भाग पडले अशी 'मी कादंबऱ्या का लिहिल्या?' या आपल्या लेखात त्यांनी स्पष्ट कबुली दिली आहे. [illegible]

१९२६ मध्ये त्यांची 'चिमणी' ही कादंबरी प्रसिध्द झाली. तेव्हापासून वयाच्या ७५ या वर्षापर्यंत भामा वरेरकरांचे लेखन अव्याहतपणे चालू होते. हा काळ म्हणजे वास्तविक विस्मृतिवादी कादंबरीचा काळ होता. ऐन बहराचा काळ होता. फडके यांच्या 'जादूगार' व 'दौलत' या कादंबऱ्या १९२७ व १९२८ मध्ये प्रसिध्द झाल्या व हळूहळू महाराष्ट्रातील सुबुध्द वाचकांतील एक फार मोठा वर्ग साखर झोपेतील स्वप्नांत दंग होऊ लागला. या ''पलायनवृत्तीच्या काळात भामा वरेरकर यांनी वास्तवाचे निशाण फडकत ठेवले आहे. जीवनाचे निरीक्षण, निरूपण व उन्नयन करण्याच्या कार्यापासून मराठी कादंबरीला त्यांनी परावृत्त होऊ दिले नाही. उदार तत्त्वांना सावरून धरले व उपेक्षितांची बाजू घेतली'' [२]. हे कुसुमावती देशपांडे यांचे विधान पूर्णपणे सत्य आहे. प्रतिमेच्या राज्यात जे करू म्हटले ते करता येतेच असे नाही. परंतू भामा वरेरकर यांनी काय करायची इच्छा बाळगली हे स्पष्ट आहे. 'विधवाकुमारी', 'धांवता धोटा', 'फाटकी वाकळ' यासारख्या कादंबऱ्या विचारात घेतल्या तर त्यांना जे करावयाचे होते त्यांत त्यांना बरेच यश आले हे दिसून येते. शिवाय हे ही मान्य करणे प्राप्त आहे की त्यांनी जे प्रश्न हाती घेतले. त्यांचे यथायोग्य चित्रण केलेले आहे.

भामा वरेरकर यांच्यावर प्रामुख्याने दोन आरोप सातत्याने झालेले आहेत. एक ते प्रचारकी लेखक आहेत असा, आणि दुसरे म्हणजे ते जणू एखाद्या वर्तमानपत्रात तावातावाने लिहिणारे पत्रकार असावेत असा. परंतु त्यांचे लेखन हे तत्कालीन महत्त्वाचे ठरावे. भामा वरेरकर यांची स्वत:ची आपल्या एकूण लेखनाविषयीची भूमिका ही उघडपणे प्रचारकी होती. त्यासंबंधी त्यांच्या मनात कोणत्याही विकल्प नव्हता असे वाटते.

कांदबरी लेखनाविषयी भामा वरेरकर यांची भूमिका ही काहीशी वेगळी परंतु तितकीच स्पष्ट होते. 'माझ्या कादंबऱ्या ह्या

माझ्या काळातील इतिहासाच्या बखरी आहेत'. ही मामांची भूमिका 'कल्पनेच्या साम्राजात विहार करून वाचकांनी दिशाभूल करण्याइतका अप्रामाणिकपणा माझ्या अंगी नाही.' असे सांगत असता हा इतिहास लिहिताना लेखकाच्या भविष्य दृष्टीच्या अनुरोधाने आदर्श चित्रे रंगविली जातात. पण ती वास्तवतेच्या उत्क्रांतीची आदर्श स्वरूपे असतात. अतएव अशी ध्येयात्मक चित्रेही वास्तवतेची हानी करत नाहीत. असे ही ते सांगतात.

मामा वरेरकर हे सृजनशील लेखक होते. वाङ्मयाविषयक चिंतन करणारे आणि आपल्या दृष्टिकोणाचा जागरूकपणे विचार करणारे विचारवंत होते. वाचकांना स्वप्नपूर्तीचे व इच्छापूर्तीचे सुख देणाऱ्या प्रणयाचे चित्रण मराठी कादंबरीत होत असतानाच मामा वरेरकर प्रणयातल्या वास्तवाचे चित्रण करीत होते. स्त्रीच्या व्यक्तितत्त्व—विकासाचा प्रश्न अधिक महत्त्वाचा आहे. त्यासाठी प्रेमाची आहुती द्यावी लागली तरी चालेल अशी धारणा त्यांच्या नायिकांची होती. मामा वरेरकर यांना 'स्त्रियांचे कैवारी' मानले जाते. मराठीत वास्तववादाची व जीवनवादाची पताका फडकवणाऱ्या मामा वरेरकर यांची कादंबरी वास्तवाच्या खडबडीत जमिनीवर न राहता कृत्रिम वाङ्मयीन परंपरांशी हातमिळवणी करते. रहस्यमय कादंबऱ्याच्या प्रभावातून वरेरकर यांच्यासारखे वास्तववादी लेखन ही सुटले नाहीत. अशा जन्मरहस्याचा उपयोग वरेरकर यांनी 'तरते—पोलाद' मध्ये केला आहे. प्रचार हेच कलेचे ध्येय ठेवून मामा वरेरकर यांनी 'धावता धोटा' आणि 'विधवाकुमारी' या कादंबऱ्या निर्माण केल्या.

मराठी कादंबरीतील दोषाचे अचूक निदान मामा वरेरकर यांनी ही केले आणि 'धावता धोटा' या कादंबरीपासून जुनी चाकोरी सोडून वरिष्ट वर्गाना समान्यत: भाबडया असलेल्या कामगार वर्गाचे, कनिष्ठ चळवळीचे व जीवनांचे चित्रण करण्याचा नवा मार्ग मिळाला व त्याला योग्य असे कनिष्ठ वर्गाच्या जीवनक्रमाचे वातावरण निर्माण

करण्याचा प्रयत्न केला. अलिकडच्या कादंबरी वाङ्मयात पूर्वीचे घरगुती व अलंकारिक असे भिन्न भिन्न भाषाप्रवाह आले व हीच भाषापध्दती मामा वरेरकर यांनी अनुसरलेली दिसून येते. मामा वरेरकर यांनी साध्या शब्दांनी वाक्यांतील सौंदर्य मराठी वाचकांना दाखविले. वास्तवजीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांची भाषा, सभोवतालच्या जीवनानुरूप व वाचकांच्या नित्य परिचयाची असणे जरूरीचे आहे. आणि हा गुण मामा वरेरकर यांच्या भाषेत दिसतो. मराठी कादंबरीच्या उत्क्रांतीत मामा वरेरकर यांच्या विकासाची पावले दिसतात. मामा वरेरकर यांच्या कादंबऱ्यात वस्तुस्थिती आणि ललित वाङ्मयात सामाजिक प्रश्नांचा पुरस्कार आढळतो. मराठी कादंबरीस गिरगावापासून गिरणगावांच्या शिवेवर नेण्याचे श्रेय मामा वरेरकर यांना जाते.

स्वमत प्रसाराचे एक प्रभावी साधन या दृष्टीने मामा वरेरकर ललित वाङ्मयाला महत्त्व देतात. त्यांच्यामते वाङ्मयनिर्मिती स्वान्त: सुखाय होत नाही. व इतरांना केवळ आनंद देणे हे ही कलेचे साध्य नाही. मामा वरेरकर यांच्यामते वाङ्मय हे एक अमोघ अस्त्र असून लोकजागृतीसाठी त्यांचा उपयोग करणे जरूरीचे आहे.

मामा वरेरकर यांचे लिखाण वकिली थाटाचे असल्याने एकांगीपणाचा दोष त्यांच्या कांदबऱ्यातून प्रकट होतो. 'कला ही जीवनासाठी आहे. उपयुक्त इष्ट प्रचारासाठी आहे' या भूमिकेचे प्रतिनिधी वाङ्मय मामा वरेरकर यांच्या कादंबऱ्यात दिसून येते. त्यांच्या कादंबऱ्यात बोधवादाचा सांधा जुळलेला आहे.

''मामा वरेरकर यांना 'प्रचारवाद' पत्करताना कमीपणा वाटत नाही. उलट अधिक बळ येते. 'राजकारण' हा ज्याप्रमाणे धंदा आहे. त्याचपमाणे वाङ्मय हे लोकशिक्षणाचे कार्य करण्याचा धंदा आहे. केवळ तोच धंदा करणारी माणसं असल्याशिवाय वाङ्मयाला आंतरराष्ट्रीय स्वरूप येणार नाही. प्रचारात्मकतेत कलेला वैगुण्य येत नाही असे मामा वरेरकरांना वाटे. वाङ्मयाचे नियोजन आणि वितरण

करणाऱ्या संस्था आणि लेखकांच्या संघटना स्थापन करण्याची आवश्यकता वरेरकर यांनी मानलेली आहे. वरेरकर यांचा उद्‌बोधनवाद पक्षीय नसल्याने ह्या प्रचाराला एक प्रकारे अधिक व्यापक लोकशिक्षणाचे रूप येते. वरेरकर ह्यांची वाङ्मयीन दृष्टी जीवनवादी पण त्यात विशेषत: वरेरकर यांच्या बाबत प्रचाराला आणि प्रचारोध्दव जीवनक्रांतीला महत्त्व आहे'' ३

वरेरकर साम्यवादी नव्हते. परंतु समाजाच्या खालच्या थरात उतरत असताना मार्क्सच्या तत्त्वज्ञानाचा जाणता किंवा अजाणता आधार वरेरकरांना घ्यावा लागलेला आहे याचे 'धावता धोटा' हे उदाहरण होय.

त्यांच्या कादंबरीतली स्त्री ही मध्यमवर्गीयांच्या मर्यादीत जीवनकक्षेच्या बाहेर पडू पाहात आहे. नुसती सुख—दु:खे नव्हे तर ती सुख—दु:खे ज्या समाजजीवनामुळे ती साकार झाली ते समाजजीवन ही जाणूण घेण्याविषयी 'स्त्री' आता उत्सुक झालेली आहे. त्यामुळे मराठी कादंबरीतले व्यक्तिदर्शन जास्त सकस, सरस, सजीव आणि म्हणूनच प्रतीतीपूर्ण होऊ लागलेले आहे. यातच प्रेमप्रवण व ध्येयप्रवण कल्पना रम्यतेत रमण्याचे खेळ पुरे झाले. वस्तुस्थितीत वावरणाऱ्या तिच्यात आगतिक होणाऱ्या, मात करणाऱ्या व्यक्तीच्या सुख—दु:खाची ओळख करून घेतली पाहिजे. तरच कादंबरीची ओळख ही प्रभावी वाङ्मय प्रकाराच्या साह्याने वाचकांपर्यंत पोहचविली पाहिजे. नवोदितांना याची जाणीव स्वातंत्र्योत्तर काळात होऊ लागली. कादंबरी हे करमणुकीचे साधन मानाने अप्रतिष्ठित आहे. कादंबरीत जीवनदर्शन घडविण्याचे असे वरेरकरांना वाटे.

वरेरकर यांच्या कादंबऱ्याचा विचार करता त्यांनी सामाजिक कादंबऱ्या लिहिताना आपली लेखनभूमिका अव्याहत टिकविली आहे. वरेरकर यांनी 'गोदू गोखले' या कादंबरीपासून

आधुनिक ऐतिहासिक कादंबऱ्या लिहण्याचा आरंभ केलेला आहे. वरेरकर यांच्या सामाजिक कादंबऱ्यात ऐतिहासिकताही भरपूर आहे. त्यांनी काल्पनिक पात्रे निवडली व त्यांच्या चित्रणाकरिता समकालीन व विद्यमान पार्श्वभूमी ही इतिहासार्थ सादर केलेली आहे. जोमदार व वैशिष्टयपूर्ण स्वभाव रेखाटनाप्रमाणे वरेरकर यांनी उपयोजिलेले सामाजिक व ऐतिहासिक वातावरण देखील ठसठसीत व परिणामकारक वाटते.

स्त्रियांच्या जन्मजात सहनशीलतेची आदर्श चित्रे पूर्वापार रेखाटण्यात आली आहेत. पुरूषांचा आक्रमक स्वभाव स्त्रियांची मिळते घेण्याची प्रवृति यामुळे विवाहसंस्थेचे स्थैर्य व पावित्र्य टिकून राहिले आहे. 'स्त्री म्हणजे पुरूषाची मत्ता' हा जो महाभारत काळापासून अलिखित संकेत होऊन बसला आहे. त्याचाच उघडउघड निषेध वरेरकर यांनी आपल्या वाङ्मयांतून केलेला आहे. पुरूषांच्या हुकुमशाहीला व अरेरावीला स्वतंत्र विचारांची नवशिक्षित 'स्त्री' बळी पडणार नाही हा वरेरकर यांचा आवडता निष्कर्ष आहे.

वरेरकर यांच्या वाङ्मयातील प्रमुख अंग म्हणजे त्यांची ग्रामजीवनाविषयीची आस्था होय. वरेरकर यांनी महाराष्ट्रातील खेडे विभागाची चित्रे आपल्या अनेक कादंबऱ्यांतून रेखाटली आहेत. खेडयातील जनतेची नाडी वरेरकर यांनी जेवढी रेखाटली तेवढी समकालीन कोणत्याच कादंबरीकाराने ओळखलेली पहावयास मिळत नाही. खेडयातील माणसे निर्बुध्द आहेत असं नव्हे, तर ती बुध्दीपेक्षा भावनेकडे जास्त लक्ष देतात. भावनेच्या डोळयांनी पाहताना बुध्दीचा जुलुम होऊ देत नाहीत. हे खेडयातील जनतेच्या अंधश्रध्दा मनोवृत्तीचे निदान वरेरकर अचूक करतात. खेडयातील लोकांच्या लहान—मोठया आशा—आकाक्षांची तेथील परिस्थिती वातावरणाची वरेरकर यांनी रेखाटलेली शब्दचित्रे वास्तवपूर्ण वाटतात. वरेरकर यांच्या कादंबऱ्यांतील खेडे विभाग सजीव व परिणामकारक वाटते.

ग्रामसुधारणेची पहिली पायरी म्हणून मामा वरेरकर यांनी जातिभेदाचे मूळ उपटले.

मामा वरेरकर हे साहित्यांतील सवत्या सुभ्यांपासून व सांप्रदायिकतेपासून बरेचसे अलिप्त आहेत. राजकारणाप्रमाणे साहित्यातही ज्या घोषणा निरामय होऊन बसल्या आहेत. त्यापासून ते मुक्त आहेत. ते वाङ्मयातील एकांडे शिलेदार आहेत. त्यांनी केलेले वाङ्मय लेखन सर्वस्वी स्वतंत्र व स्वयंपूर्ण आहे. कुणाची वाङ्मय पीठिका चालवावी अगर संप्रदाय चालवावा या हेतूने त्यांनी लेखन केलेले नाही तर स्वदोष दिग्दर्शनांचे व सत्यकथनकाचे काम करीत असताना ते फटकळपणा दाखवितात त्यामुळे ते फारसे लोकप्रिय झालेले नाहीत. त्यांची कादंबरीची मांडणी एकूण खडबडीत व ललित्यशून्य वाटते. कल्पना विलासाची व भाषाविलासाची कदर त्यांनी केलेली नाही. विचारप्रतिपादन व मतप्रचार या दोन हेतूंनी त्यांनी वाङ्मय निर्मिती केलेली आहे. सामाजिक सुधारणेची खरीखुरी कळकळ बाळगूनच वरेरकर यांनी वाङ्मय क्षेत्रात पदार्पण केलेले आहे. व वाङ्मय लेखनाचा ध्यास घेतलेला आहे.

जीवनाचे केंद्र म्हणजे व्यक्ति.... व्यक्तिचित्रणातील समरसत्तेवर कादंबरीचा प्राण अवलंबून असतो.... माणसाच्या अंत:करणाविषयी सहृदय समज व मानवी जीवनाविषयी व्यापक जाणीव व सुसंगत दृष्टिकोण [illegible]

कादंबरीकार मामा वरेरकरांचे स्थान निश्चित करीत असताना 'विधवाकुमारी' व 'गोदू गोखले' हया दोन कादंबऱ्या महत्त्वाच्या वाटतात. मामा वरेरकरांनी आपल्या कादंबऱ्यामधून प्रामुख्याने सामाजिक प्रश्न मांडले व त्यातूनच समाज परिवर्तन घडवून आणले

हे करीत असताना वरेरकरांनी 'स्त्री' ही केंद्रस्थानी मानून स्त्रीच्या जीवनाचे अंतरंग उकलून दाखवले आहे. वरेरकरांना स्त्री—जाती विषयी आपुलकी व कणव होती म्हणूनच त्यांनी 'विधवाकुमारी' ही कादंबरी लिहिली. तेव्हापासूनच वरेरकरांना 'स्त्रियांचे कैवारी' म्हणून लौकिक मिळाला.

( ) सामाजिक सुधारणेची खरीखुरी कळकळ बाळगूनच वरेरकरांनी वाङ्मय क्षेत्रात पदार्पण केले होते. वरेरकरांचे वाङ्मय लेखन चौफेर होते. हे त्यांच्या साहित्यातून दिसून येते. वरेरकरांनी आपल्या कादंबऱ्यातून विविध विषय हाताळून समाजामध्ये पोषक असे पुरोगामी विचार मांडले. वरेरकरांच्या लेखणीची भाषा अतिशय साधी व सोपी असल्यामुळे वाचकांच्या मनावर वरेरकरांचे विचार खोलवर रूजले गेले आहेत हे त्यांच्या 'विधवाकुमारी' व 'गोदू गोखले' हया कादंबऱ्यातून दिसून येते.

वरेरकर हे संयमशील व प्रचारकुशल लेखक होते. त्यांनी ग्रामीण जीवनातील वस्तुस्थितीचे जिवंत चित्र रेखाटले आहे. त्यावरून वरेरकर हे एक प्रभावी वास्तवदर्शी कादंबरीकार होते हे स्पष्ट होते. मराठी लेखकांना केवळ लेखणीच्या बळावर मानाने जगता यावे यासाठी वरेरकर आयुष्यभर झगडले. परंपरेवर आघात करून किंवा परंपरेला नवे वळण देऊन नव्या निष्ठा व नवी मूल्ये प्रस्थापित करण्याची धारणा ही पुरोगामित्वाची महत्त्वाची खूण ही वरेरकरांच्या अंगी होती. भाषांतरकार म्हणून काम करीत असताना वरेरकर यांची बोजड, लांबलचक व मोठी वाक्यरचना आढळत नाही. हा वरेरकरांच्या अंगी असणारा महत्त्वाचा गुण होता.

वरेरकरांची भाषा वास्तव होती. म्हणूनच त्यांनी सामाजिक प्रश्नावरील आपली नजर कधीच ढळू दिली नाही. हुंडयाचा प्रश्न, स्त्रीमुक्ती, ग्रामसुधारणा, मजुरांचा प्रश्न यासारख्या

प्रश्नांची मांडणी वरेरकरांच्या कादंबऱ्यातून दिसून येते. समाजमनस्कता हे त्यांच्या लेखनाचे वैशिष्टय होते.

(५)- [illegible]

( ) [illegible]

( ) [illegible]

( ) कादंबरीकार या नात्याने वरेरकरांची योग्यता ठरवित असताना वरेरकरांची भूमिका कशा प्रकारची होती हे मागील प्रकरणामध्ये पहिले आहे. श्रेष्ठ कादंबरीकाराला आवश्यक असणारे अनेक गुण मामा . वरेरकर यांच्यामध्ये होते, पण मराठी कादंबरीकारांच्या पंक्तीत वरेरकरांना योग्य ते स्थान मिळाले नाही. याला कारण वरेकरांची वृत्तीच काही अंशी कारणीभूत होती असे म्हटले जाते. दुसऱ्याच्या टीकेला अनुसरून स्वत:च्या लेखनात सुधारणा करण्याची वृत्ती वरेरकरांची नव्हती. त्यांचा सवता सुभा असल्याने स्वत:ला वाटेल, पटेल तेच लिहिणे त्यांना मान्य होते.

[illegible] ...कार [illegible] 'विधवाकुमारी' आणि 'गोदू गोखले' या कादंबऱ्यातून त्यांनी ज्या प्रकारे स्त्रियांच्या समस्यांचे चित्रण केले, स्त्रियांच्या तत्कालीन समस्यांना व्यापक रूप दिले आणि बंडखोरीचे निशाण फडकवले त्यावरून कादंबरीकार म्हणून [illegible] समकालीन कादंबरीकारांच्यामध्ये मामा वरेरकरांचे वेगळेपण दिसून येते.

## संदर्भ सूची


१. डॉ. कुलकर्णी भीमराव (वरेरकर — सावरकर जन्मशताब्दी विशेषांक अंक २२३—२२४, (जोडअंक) ) महाराष्ट्र साहित्य पत्रिका जानेवारी ते जून १९८३, पृष्ठ क्रमांक. ६

२. देशपांडे कुसुमावती (मराठी कादंबरीचे पहिले शतक) मराठी साहित्यसंघ मुंबई, आवृत्ती २ री, २० जुलै १९५३, पृष्ठ क्रमांक — १७४

३. प्रदक्षिणा खंड पहिला (१८४० ते १९६० या कालखंडातील आर्वाचीन मराठी वाङ्मयाचा चिकित्सक ऐतिहासिक आढावा) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, सातवी आवृत्ती, पुणे ३०, पृष्ठ क्रमांक ३४२ ते ३४३